Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# बी.एड्. प्रशिक्षणार्थींचा शिक्षकीव्यवसायाबाबतच्या अभिवृत्तीचा विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. दीपक रामदास बाविस्कर**
(एम.ए.,एम.एड्., एम.फिल.,सेट,पीएच. डी.)
अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे

**प्रास्ताविक : -**

अभिवृत्ती आणि शिक्षण यांचा जवळचा संबंध आहे. कोणताही व्यवसाय करतांना त्या व्यवसायाची आवड असणे त्यात अभिवृत्ती असणे आवश्यक असते. त्याच प्रमाणे शिक्षकीव्यवसायात तर ते अधीक असणे आवश्यक आहे. कारण शिक्षक आणि शिक्षण ह्या इतर व्यवसायापेक्षा निश्चितच वेगळ्या आणि विशेष बाबी आहेत. शिक्षकी व्यवसाय हा सेवा म्हणून केला जाणारा व्यवसाय आहे. त्यातून मिळणारे आर्थिक मानधनापेक्षा विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करतांना येणारा आनंद या व्यवसायातील सर्वोच्च आनंद असतो. शिक्षक होण्यासाठी असलेल्या प्रशिक्षणात याबाबींवर अधीक भर देण्यात येतो म्हणूनच बी. एड्. प्रशिक्षणात शिक्षकीव्यवसायाबाबत असणाऱ्या मूल्यांचा विचार करुनच या अभ्यासक्रमाची रचना करणे आवश्यक मानले जाते.

व्यक्तीला इतर व्यवसाय निवडतांना अनेक बाबींचा विचार कराव लागतो. स्थळ, काळ, बाजारपेठ , मागणी तसेच पुरवठा यासाऱ्यांचा विचार करुनच व्यक्ती व्यवसायासाठी योग्य दिशा ठरवू शकते. मात्र याबरोबरच शिक्षकी व्यवसाय करु पाहणाऱ्यांसाठी अधीकच्या बाबींचा विचारही करणे गरजेचे असते. या व्यवसायाचा प्रत्यक्ष व्यक्ती, विद्यार्थी, पालक, समाज , सहकारी शिक्षक आदींची संबंध येत असल्याने तो विचार महत्वाचा ठरतो. तसेच व्यवसाय निवडणाऱ्या व्यक्तीची त्या व्यवसायाप्रती असणारी अभिवृत्ती योग्य असणे हा अधिक महत्वाचा घटक या व्यवसायातील वेगळेपणे स्पष्ट करणारा असतो.

शिक्षकीव्यवसायासाठी बौध्दिक क्षमतेबरोबरच व्यवसायाप्रती अभिवृत्ती असल्यास व्यक्ती अधिक यशस्वी होण्यास पोषक वातावरण निर्माण होते. या व्यवसायाची प्रत्यक्ष मानवी संबंधांशी जवळीक येत असल्याने अध्यापन करणाऱ्याची योग्य अभिवृत्ती असणे आवश्यक आहे. पुर्वीअसे म्हटले जायचे वेळ आहे म्हणून बी. एड्. प्रशिक्षणक घेऊन टाक मात्र आता या म्हणण्याला अर्थ उरलेला नाही कारण बौध्दिक क्षमता आणि अभिवृत्ती यासाऱ्यांचाच कस हा व्यवसाय करतांना लागतो. निवडीच्या प्रक्रीयेपासून याला उमेदवाराला सामोरे जाणे आवश्यक असेत. पैसा किंवा वशीला असणाऱ्या शिक्षकाचे पुढे काय होते याची अनेक उदाहरणे सभोवताली दिसता. त्याचा अध्ययन अध्यापनावार तसेच विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर मोठा

विपरीत परिणाम घडतांना दिसतो. यासाठी या व्यवसायाती येणाऱ्यांकडे व्यवसायाप्रती योग्य अभिवृत्ती असणे आवश्यकच आहे.

**संशोधनाची गरज किंवा महत्व : -**

बी. एड्. प्रशिक्षणार्थींची व्यवसायाप्रती अभिवृत्ती तपासणे हे अधिक महत्वाच असल्याने या संशोधनाचे महत्व आणि गरज अधोरेखीत होते. संशोधकाचा अध्यापन क्षेत्रातील अनुभव पाहता बी. एड्. प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या व्यवसायाचे महत्व किंवा त्यासाठी लागणाऱ्या क्षमतांची जाणीवच नसते. नियमित महाविद्यालय शिक्षणासारखेच ते या शिक्षणाकडेही पहात असतात. मात्र प्रत्यक्ष प्रशिक्षणसुरु झाल्यावर त्यांच्या लक्षात येते की, हे शिक्षण आतापर्यंतच्या शिक्षणापेक्षा वेगळे आहे. या ठिकाणी आपल्याला शिकण्याबरोबर शिकविणे आवश्यक आहे. त्यावेळी खऱ्या अर्थाने त्यांच्या ज्ञानाला कस लागतो.

शालेय जीवनात विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे ज्ञान मिळणे आवश्यक असते. हे ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थी जसा धडपड करतो तसेच शिक्षकाने ज्ञानार्जनासाठी धडपडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची ज्ञानाची भूक भागविणारा शिक्षक आपल्या व्यवसायात यशस्वी होतांना दिसतो. शिक्षकीव्यवसाय करतांना अध्ययन अध्यापनाबरोबरच सतत नवनवीन शिकत रहाणे, प्रयोग करणे, आपले ज्ञान अद्ययावत करणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षकीव्यवसायाप्रती चांगली अभिवृत्ती असल्याशिवाय व्यक्ती ते करु शकत नाही. म्हणूनच सदर संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची उिद्दष्टे : -**

१. बी. एड्. प्रशिक्षणार्थींच्या शिक्षक व्यवसायाबाबतच्या अभिवृत्तीचा शोध घेणे.

२. बी. एड्. अभ्यासक्रमातील व्यावसायीक मूल्यांचा आढावा घेणे.

३. बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांमध्ये व्यावसायिक अभिवृत्तीवाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

४. प्रशिक्षणातील व्यावसायीक मूल्य आणि अभिवृत्तीवाढीची योग्य सांगड घालणे.

**गृहितके : -**

१. बी. एड्. प्रशिक्षणार्थी मुला - मुलींमध्ये शिक्षक व्यवसायाबाबत भिन्न अभिवृत्ती दिसून येत नाही.

२. बी. एड्. अभ्यासक्रमात व्यावसायिक मूल्यांचा समावेश आढळून येतो.

३. बी. एड्. प्रशिक्षणार्थींची शिक्षक व्यवसायाबाबत योग्य अभिवृत्ती दिसून येते.

**संशोधनाची कार्यपध्दती : -**

धुळे तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांची यादृच्छिक सप्रयोजन पध्दतीने निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये घेतली असून संशोधन कालमर्यादेचा विचार करता , अपव्यय टाळून संशोधनाची मर्यादा निश्चित करण्यात आली. प्रस्तुत संशोधन धुळे तालुक्यातील दोन महाविद्यालयांपुरतेच मर्यादित आहे. संशोधकाने सदर संशोधनासाठी अभिवृत्ती मापीकेचा तसेच अभ्यासक्रमासाबंधीच्या माहितीसाठी स्व निर्मित प्रश्नावलीचा उपयोग केलाअसून निष्कर्षासाठी सरासरी या सांख्यिकी तंत्राचा उपयोग केला आहे.

**न्यादर्श निवड :-**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अध्ययनार्थी | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १. | अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे | २५ | २५ | ५० |
| २. | गंगामाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नगाव | २५ | २५ | ५० |
| | एकुण | ५० | ५० | १०० |

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी संशोधकाने अभिवृत्ती मापन चाचणी व स्वनिर्मित चाचणीचा उपयोग केलाआहे.

१. प्रशिक्षणार्थीची अभिवृत्ती मापन चाचणी .

२. व्यावसायीक अभ्यासक्रम मूल्यमापन प्रश्नावली.

न्यादर्शातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त आधारभूत माहितीच्या विश्लेषणाकरीता, मध्यमान, सरासरी या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग केला आहे.

**अभिवृत्तीमापिकेची विधाने व घटकानुसार रचना : -**

बी. एड्. प्रशिक्षणार्थीसाठीच्या अभिवृत्ती मापिकेत एकुण २८ विधानांची रचना करण्यात आली होते. त्यात विधान क्रमांक १ ते ८ मध्ये व्यावसायीक ज्ञान. विधान क्रमांक ९ ते १५ व्यावसायिक अभिवृत्ती. विधान क्रमांक १६ ते २२ विषय प्रभूत्त तर विधान क्रमांक २३ ते २८ मध्ये नेतृत्त क्षमता तपासणीचे घटक होते. अशाप्रकार विधानांची रचना असून पंचबींदू पडताळा सूचीचा उपयोग करण्यात आला. त्यानुसार सरासरी काढून निष्कर्ष मांडण्यात आले.

**विधानांच्या पंचबींदू पडताळा सूची नुसार आलेल्या सरासरीची मांडणी सारणी -**

| अ.क्र. | पंचबींदू सूची | अभिवृत्ती मापिका विधानांचे घटक, सरासरी गुणक | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | व्यवसायीक ज्ञान | अभिवृत्ती | विषय प्रभुत्व | नेतृत्व क्षमता |
| १. | पुर्णपणे सहमत | ७५ % | ८२ % | ७६ % | ६८ % |
| २. | सहमत | २५ % | १४ % | २४ % | १२ % |
| ३. | अनिश्चित | ०० % | ०२ % | ०० % | १५ % |
| ४. | असहमत | ०० % | ०२ % | ०० % | ०५ % |
| ५. | पुर्णपणे असहमत | ०० % | ०० % | ०० % | ०० % |

वरील सारणीच्या सरासरी वरुन व्यवसायीक ज्ञानाशी पुर्णपणे सहमत ७५ % तर सहमत २५ % आहेत. अभिवृत्तीत पुर्णपणे सहमत ८२ % ती १४ % सहमत आहेत. तसेच विषय प्रभुत्व ७६ % पुर्णपणे सहमत तर २४ % सहमत आहेत. नेतृत्व क्षमतेत ६८ % पुर्णपणे सहमत तर १५ % अनिश्चित आहेत.

**निष्कर्ष : -**

१. व्यवसायीक ज्ञान असणे आवश्यक म्हणणाऱ्यांचे सरासरी प्रमाण जास्त असल्याने ते महत्वाचे आहे.

२. अभिवृत्ती संबंधी ८२ % सर्वाधीक पुर्णपणे सहमत असल्याने ते महत्वाचे आहे.

३. विषय ज्ञान आणि नेतृत्व क्षमता अनुक्रमे ७६ % व ६८ % आहे. मात्र १५ % अध्ययनार्थी नेतृत्व क्षमतेच्या संदर्भात अनिश्चित आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची : -**

१. करंदीकर, सुरेश, (१९९७) 'शैक्षणिक मानसशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. मुळे, रा. श. आणि उमाटे वि. तु. (१९९८) 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

३. जगताप ह. ना. 'शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तन' (१५ डिसेंबर १९९२) नुतन प्रकाशन, पुणे